MHPU180026422018

## निशाणी क्र.०५ वरील आदेश
## (दिनांक २८.०४.२०२२)

प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादीं विरुध्द तुर्तातुर्त ताकिदीसाठी दाखल केला आहे.

२. **मिळकतीचे वर्णन –** मौजे टाकळी – भिमा, ता.दौंड, जि. पुणे येथील शेतजमीन मिळकत हल्लीचा गट नं.१४१, याचे क्षेत्र ४ हे. १३ आर, आकार ९–५६ पैसे यातील कॅनॉल चारीकडे गेलेले क्षेत्र १ आर वजा जाता संपुर्ण गट नंबर मिळकतीचे क्षेत्र यातील वादीचे मयत वडिल कै.कचरदास विठोबा ठाकर यांचे हिश्याचे ५ आणे ४ पै हिश्याचे क्षेत्र हा या दाव्याचा विषय असुन तिला यापुढे ''**दावा मिळकत**'' म्हणुन संबोधिले जाईल).

३. दावा मिळकत ही मुळची वादीचे वडिल कै. कचरदास विठोबा ठाकर यांची वडिलार्जित मालकी वहिवाटीची वाटपास पात्र असलेली अविभक्त एकत्र कुटुंबाची मिळकत असुन, वादीचे आजोबा विठ्ठल सावळा ठाकर हे टाकळी भिमा गावी ता. १०/०६/१९८२ रोजी मयत झाले. त्यांना वारस म्हणजे वादीचे मयत वडिल कचरदास आणि हल्लीचे प्रतिवादी नं.२ व ३ अनुक्रमे केरु विठोबा ठाकर आणि बाळु विठोबा ठाकर एवढेच वारस असुन, वाद मिळकतीचे संदर्भात याशिवाय कोणीही वारस नसल्याने कै.विठ्ठल सावळा ठाकर म्हणजे वादीचे पुर्वहक्कदार यांचे पश्चात वाद मिळकतीचे संदर्भात वारस रजिस्टर नं.८८ फे.नं.१०५ नुसार ता.१६/०६/१९८४ रोजी वादीचे मयत वडील कचरदास आणि वादीचे चुलते अनुक्रमे केरु व बाळु ठाकर यांची नावे वाद मिळकतीचे रेकॉर्डला कायदेशीर वारस म्हणुन नोंद झाली. अशाप्रकारे वाद मिळकतीचे पुर्वहक्कदार म्हणजेच वादीचे आजोबा विठ्ठल सावळा ठाकर यांच्यापश्चात वाद मिळकतीचे संदर्भात वादीचे वडील कचरदास ठाकर यांना वाद मिळकतीत वारसाहक्काने अविभक्त स्वरुपात ५ आणे ४ पै हिश्याची मालकी व समाईकात कब्जा मिळाला.

४. वादीचे आजोबा कै.विठ्ठल ठाकर अगर हल्लीचे प्रतिवादी केरु व बाळु अगर वादीचे वडिल कचरदास यांचेदरम्यान दिवाणी न्यायालयाचा वाटपाचा हुकुमनामा अगर नोंदणीकृत स्वरुपातील वाटप असे कोणत्याही स्वरुपात कधीही वाटप झालेले नव्हते व

नाही. तसेच तोंडी अगर लेखी सुध्दा वाद मिळकतीचे कधीही वाटप झालेले नव्हते व नाही त्यामुळे वाद मिळकत ही समाईक मालकी हक्क वहिवाट स्वरुपातच राहिली त्यामुळे वाद मिळकत ही वाटपास पात्र आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ हिने वाद मिळकतीसंदर्भात फे.नं.१५७३, वादी ही वारस असताना वस्तुस्थिती लपवुन ठेवुन खोटया प्रतिज्ञापत्राआधारे व खोटयामाहिती आधारे अस्तित्वात आणला आहे. प्रतिवादी क्र.४ ने अज्ञान असताना जिल्हा न्यायालयाची परवानगी न घेता सन १९९५ चा रददबातल स्वरुपात खरेदीदस्त अस्तित्वात आणल्याने वादीस तातडीने हा दावा दाखल करावा लागला आहे. प्रतिवादी क्र.१ ने अस्तित्वात आणलेल्या बोगस फे.नं.१५७३ अन्वये वाद मिळकतीची विक्रि झाल्यास सदर दावा निरर्थक होउन वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. तसेच वाद मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही म्हणुन बॅलन्स ऑफ कन्व्हेनिअन्स वादीच्या बाजुने आहे. त्यामुळे वादीने तुर्तातुर्त ताकीद देण्यासाठी व प्रतिवादी क्र.१ ते ४ किंवा त्यांच्यातर्फे इसम यांनी वाद मिळकतीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तबदिली, थर्ड पार्टी इन्ट्रेस्ट निर्माण करु नये करिता वादीस दावा दाखल करणे भाग पडले आहे.

५. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दाव्यात हजर होउन नि.३१ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केलेला आहे. त्यामध्ये त्यांनी वादीची कथने धुडकावुन लावली आहेत. त्यांचे असे कथन आहे की, वादीचा दावा व मनाई अर्ज कायदयाने चालणारा नाही व मनाई अर्जातील तत्वतः मान्य केलेला मजकुर वगळता त्यांनी इतर सर्व मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे. त्यांनी कलम १ मध्ये वर्णन केलेली परिस्थिती अंशतः मान्य केली आहे व कलम २ ते १८ मधील मागण्या न्याय व कायदेशीर नसल्यामुळे सदर मागण्या मान्य करु नये व दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे. उलट वास्तविक परिस्थिती अशी आहे की, प्रतिवादी क्र.१ चा विवाह कै.कचरादास विठोबा ठाकर यांच्याबरोबर सन १९६५ सालाच्या दरम्यान झालेला होता. प्रतिवादी क्र.५ या मौजे टाकळी भिमा येथुन परागंदा झालेल्या होत्या व त्यांचे मानसिक संतुलन बिघडलेले होते व त्या परागंदा झालेल्या होत्या. त्यामुळे कै.कचरादास विठोबा ठाकर व त्यांचे बंधु प्रतिवादी नं.२ व ३ यांनी व प्रतिवादी नं.४ नवनाथ बाळु ठाकर यांनी वडिलांप्रमाणे त्यांचा सांभाळ, पालनपोषण केलेले होते. वादीला वाटपाचा कोणताही कायदेशीर हक्क नव्हता व नाही तसेच वादीने दाव्यामध्ये दावा मिळकतीच्या चतुःसिमा दिलेल्या नसुन, वादीला दावा

मिळकतीबाबत कोणतीही माहिती नव्हती व नाही. वादीने प्रतिवादीं विरुध्द खोटा व बनावट दावा दाखल केला आहे व वादीकडुन रु.१०,०००/– नुकसान भरपाई मिळण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

६. वादीतर्फे विद्वान वकील श्री.एस.आय.इनामदार व प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे विद्वान वकील श्री. महेंद्र आवाळे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

७. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कथन विचारात घेता खालील प्रश्न निर्माण होतात. त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा येणेप्रमाणेः–

| अ.क्र. | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी प्रकरण वादीच्या बाजुने आहे काय? | – | होय. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय? | – | होय. |
| ३. | अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे भविष्यात न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादी सिद्ध करते काय? | – | होय. |
| ४. | आदेश काय? | – | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

८. वादीने तिच्या कथनाप्रित्यर्थ गट नं.१४१ चा ७/१२ चा उतारा, फेरफार क्र.१०५, फेरफार क्र.१५७३, फेरफार क्र.३७४, वादीने उपविभागीय अधिकारी उपविभाग पुरंदर, सासवड यांच्या कोर्टात प्रतिवादी क्र.१ विरुध्द दाखल केलेल्या आरटीएस अपिलातील छायांकित प्रत, फौजदारी कि.अर्ज क्र.४०६/२०१८ मधील नि.१ वरील आदेश इत्यादी कागदपत्र नि.३ यादीलगत दाखल केली आहेत. तसेच यादी नि.३२ लगत मौजे भिमा टाकळी येथील गट नं.१४१ संदर्भात फेरफार क्र.१९१३, नि.३४ लगत वादीचा जन्म दाखला, मौजे भिमा टाकळी येथील गट नं.१४१ चा ७/१२ उतारा, तसेच यादी नि.३६ लगत वादीचे प्रतिज्ञापत्र दि.२३/०३/२०२२ फेरफार क्र.२७३१ ची प्रमाणित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

याउलट प्रतिवादी क्र.१ ते ४ तर्फे कोणतीही कागदपत्रे दाखल करण्यात आलेली नाहीत.

**९. दोन्ही पक्षांना मान्य असलेली परिस्थिती –**

दावा मिळकत ही मुळची विठोबा ठाकर यांच्या मालकीची होती. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे वारस म्हणुन कचरदास विठोबा ठाकर, प्रतिवादी क्र.२ व ३ यांची नावे फेरफार क्र.१०५ नुसार लागलेली आहेत. प्रतिवादी क्र.५ ही मौजे टाकळी भिमा येथुन परागंदा झालेली आहे. ती मानसिकदृष्टया दुर्बल असल्याने बेपत्ता आहे. कचरदास विठोबा ठाकर यांनी प्रतिवादी क्र.१ बरोबर विवाह केला आहे व ते दि.१४/०४/२००९ रोजी मयत झाले. याबाबी दोन्ही पक्षांना मान्य आहेत.

**<u>प्रश्न क्रमांक १ ते ३ करीताः</u>–**

**१०.** सर्व प्रश्न एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता सर्व प्रश्न एकत्रित विवेचनाकरीता घेत आहे. वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही वादीचे वडिलांची वडिलोपार्जित मिळकत आहे फेरफार क्र.१०५ चे अवलोकन केले असता विठठल सावळा ठाकर हे दि.१०/०६/१९८२ रोजी मयत झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणुन कचरदास ठाकर प्रतिवादी क्र.२ व ३ यांची नोंद दि.१६/०६/१९८४ रोजी प्रमाणित झाल्याचे दिसते. फेरफार क्र.३७४ चे अवलोकन करता कचरदास विठोबा ठाकर यांचेकडुन प्रतिवादी क्र.४ यांनी गट नं.१४१ क्षेत्र ४ हे. १३ आर पैकी त्यांच्या हिश्यातील गटाच्या पुर्वेचे क्षेत्र ० हे. ५० आर जिराईत जमीन रक्कम रु.४०,०००/– दि.२१/०७/१९९५ रोजी खरेदी घेतली. त्याची नोंद दि.०४/१०/१९९५ रोजी प्रमाणित झाल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. ५ व कै.कचरदास ठाकर यांची ती मुलगी असुन कायदेशीर वारस आहे. प्रतिवादी क्र. ५ ही कचरदास ठाकरची प्रथम पत्नी होती. तिच्या हयातीत कचरदास ठाकर यांनी प्रतिवादी क्र.१ शी बेकायदेशीर विवाह केला आणि कचरदास यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी क्र.१ ने वादी वारस असताना स्वतःचे नाव वारस म्हणुन दावा मिळकतीत बेकायदेशीररित्या लावुन घेतले. फेरफार क्र.१५७३ चे अवलोकन करता कचरदास ठाकर मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ चे नाव दावा मिळकतीत लागले. ती नोंद दि.१४/०९/२०१८ रोजी प्रमाणित झाली. त्यास वादीने उपविभागीय अधिकारी पुरंदर सासवड यांच्याकडे दि.०५/११/२०१८ रोजी आरटीएस अपिल दाखल करुन

हरकत घेतली आहे. त्यात पुढे काय आदेश झाले याबाबतची कागदपत्रे वादीने दाखल केलेली नाहीत. प्रस्तुतचा दावा वादीने दि.१७/११/२०१८ रोजी दाखल केल्याचे दिसुन येते. त्यानंतर सदर दाव्याचे कामकाज चालु असताना प्रतिवादी क्र.१ ने स्वाती नवनाथ ठाकर म्हणजे प्रतिवादी क्र.४ ची नातेवाईक यांना रक्कम रु.४,९०,०००/– रुपयास दि.३१/०८/२०२१ रोजी खरेदीदस्त क्र.२८२४/२०२१ नुसार खरेदी दिली. त्याची नोंद फेरफार क्र.१९१३ अन्वये दि.२७/०९/२०२१ रोजी प्रमाणित झाल्याचे दिसते. त्यावरुन ७/१२ उता–यावर प्रतिवादी क्र.१ चे नाव वगळुन स्वाती ठाकर यांचे नाव ० हे. ५७ आर इतक्या क्षेत्रास लागल्याचे दिसुन येते. वादीचा दावा मिळकतीत ५ आणे ४ पै इतका हिस्सा आहे हे दाखविण्याकरिता वादीने प्रतिवादी क्र.५ चतुराबाई ही मौजे मुर्टी ता. बारामती येथे राहत होती. नामदेव आबा बालगुडे हे चतुरा कचरदास ठाकरचे वडील होते त्यांचा मृत्यु दि.१७/०२/१९७१ रोजी झाल्यानंतर त्यांचे वारस म्हणुन गाव मुर्टी ता. बारामती येथील गट नं.२४१/२, ४३०/३ या मिळकतीचा फेरफार नं.७३१ नुसार नामदेव आबा बालगुडे चे वारस म्हणुन श्रीरंग तुकाराम बालगुडे, रघुनाथ तुकाराम बालगुडे, हनुमंत तुकाराम बालगुडे, प्रतिवादी क्र.५ ही तिच्या माहेरी राहत असताना वादीचा जन्म झाला. तिच्या लहानपणी कचरदास ठाकर यांनी प्रतिवादी क्र.१ सोबत लग्न केले. वादी ही लहानपणापासुन तिच्या आजोळी मुर्टी, ता.बारामती येथे राहत होती व तिचे लग्नापुर्वीचे नाव संगिता कचरदास ठाकर असे होते व लग्नानंतर ते संगिता संजय भडंगे असे नाव झाले. वादीचे वडील दि.१४/०४/२००९ रोजी मयत झाले. त्यांच्या मृत्युचा दाखला मिळविण्यासाठी वादीने फौ.कि. अर्ज नं.४०६/२०१८ दाखल केला. त्याचा निकाल दि.०१/१०/२०१८ रोजी लागला. त्याची छायांकितप्रत नि.३/५ लगत दाखल आहे. वादी कचरु ठाकर यांची मुलगी असल्याबाबत तिचा जन्माचा दाखला नि.३४ यादीलगत पडताळणीप्रत दाखल केलेली आहे. त्यावरुन तिचा जन्म दि.०१/१०/१९६८ साली झाल्याचे दिसते. वडिलांचे नाव कचरु विठोबा ठाकर, आईचे नाव चतरुबाई कचरु ठाकर असे दिसुन येते. वादीचा दावा मिळकतीमध्ये हक्क, हितसंबंध असल्याचे वादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादी क्र.१ ने तिच्या नावे असलेले क्षेत्र स्वाती नवनाथ ठाकर यांना विक्रि केल्याचे दिसुन येते. तसेच दावा मिळकतीतील ० हे. ५० आर इतके क्षेत्र प्रतिवादी क्र.४ च्या नावे मयत कचरदास यांनी खरेदी दिलेले होते. त्यानंतर ७/१२ उता–यावर नोंदी झालेल्या आहेत. प्रस्तुत अर्जात वादीने प्रतिवादी क्र.१ ते ४ विरुध्द त्यांनी व त्यांच्यातर्फे इसम यांनी वाद मिळकतीसंदर्भात कोणत्याही प्रकारची

तबदीली, ति–हाईत इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नयेत म्हणुन तुर्तातुर्त मनाईची मागणी केली आहे. वादीचा दावा मिळकतीमध्ये प्रथमदर्शनी हक्क हितसंबंध असल्याचे वादीने सिध्द केले आहे. त्यामुळे वाद मिळकतीचे संरक्षण करणे आवश्यक आहे. वादीने दाव्यात दावा मिळकतीच्या वाटपाची मागणी केलेली आहे. त्यामुळे सोयीचा कल वादीच्या बाजुने असल्याचे दिसुन येते. सदर अर्ज मंजुर न केल्यास वादीच्या हक्क व अधिकारास बाधा निर्माण होईल तसेच तिचे कधीही भरुन न येणारे नुकसान होईल. याउलट अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मी वरील विवेचन व कारणांवरुन प्रश्न क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होय नोंदवित आहे.

**<u>प्रश्न क्र. ४ करिता–</u>**

**११.** प्रश्न क्र.१ ते ३ वर नोंदविलेल्या निष्कर्षाच्या अनुषंगाने वादीने प्रथमदर्शनी केस असल्याचे, सोयीचा कल वादीच्या बाजुने असल्याचे सिध्द केलेले आहे. वादी व प्रतिवादींनी नमुद केलेले प्रश्न हे दोन्ही पक्षांनी आपापला पुरावा दिल्यानंतर अंतिम निकालाच्या वेळी सिध्द होईल. त्यामुळे प्रश्न क्र. ४ च्या निष्कषार्थ मी खालील आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा नि.क्र.५ चा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी दाव्याचा निकाल लागेपावेतो स्वतः अगर त्यांचे नोकर, चाकर, मुखत्यार, नातेवाईक इतरांमार्फत कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे गहाण, दान, बक्षिस खरेदी, तबदीली, हस्तांतर इत्यादी करु नये तसेच ति–हाईत इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नयेत.

३. खर्चाबाबतचे आदेश निकालाधीन.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2022.04.29 11:47:00 +0530

(श्रीमती. जे.बी.गोयल)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
ता.दौंड, जि. पुणे

दि.२८.०४.२०२२
दौंड

C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | A.V.Tungar |
| Court name | : | Smt. J. B. Goyal,<br>C.J. (J.D.) & JMFC, Daund |
| Date | : | 28.04.2022. |
| Judgment signed by | : | |
| Presiding Officer on | : | 29.04.2022. |
| Judgment uploaded on | : | 29.04.2022. |

...